एम.ए.सी.पी.क्र. ४२/२०१६
नंदा -वि- इम्रान अहेमद

नि.क्र. ५५ च्या खाली

माझे नांवः   सचिन विनायकराव जपुलकर
वयः ३८ वर्ष, व्यवसायः  नोकरी
रा- खामगांव ता. खामगांव जि. बुलडाणा

गैरअर्जदार क्र. २ तर्फे सरतपास वकील श्री. डी.एस. चव्हाण यांचे मार्फत शपथेवर सुरु.

१.        मी गैरअर्जदार क्र. २ यांचे खामगांव येथील शाखेत मार्च, २०२२, पासुन व्यवसाय प्रबंधक म्हणून कार्यरत आहे. आज रोजी सदर प्रकरणामध्ये पुरावा देण्यासाठी मला अधिकारपत्र प्राप्त आहे. तो पत्र आता मला दाखविण्यात आला. हा तो तोच पत्र असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि.क्र. ५६ देण्यात येत आहे. मी या प्रकरणामध्ये विमा पॉलीसीचा एक नमुना छायांकित प्रतीमध्ये दाखल केला आहे. तो आर्टिकल "अ" वर आहे. (येथे साक्षीदारास अर्जदारानी विमा पॉलीसी नि.क्र. ३३ ची प्रत दाखविण्यात आली). अशा प्रकारची पॉलीसी गैरअर्जदार क्र. २ कंपनी देत नाही. सदरची विमा पॉलीसी आमच्या कंपनीची नाही. कारण, आमच्या कंपनीला सदर विमा पॉलीसी बद्दल त्या कालावधीसाठी प्रिमियम प्राप्त झालेला नव्हता. त्याचप्रमाणे विमा पॉलीसी नमुना (आर्टिकल अ) मध्ये नमुद केल्याप्रमाणे हया विमा पॉलीसी मध्ये कालावधी एका चौकनमध्ये नमुद नाही. याप्रकरणामध्ये मी दि. १०/०१/२०१५ ते २४/०१/२०१५ पर्यंतचा पॉलीसी प्रिमियम रजिष्टरचा प्रमाणीत उतारा दाखल केला आहे.  तो आता मला दाखविण्यात आला. या उता-यामध्ये विमा धारकाचे नांव, पॉलीसी क्रमांक, पॉलीसीचा वैद्य कालावधी व प्रिमीयमची रक्कम नमुद असते. या उता-याप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ यांचे नावाने विमा पॉलीसी बद्दल भरलेली रक्कम ही नमुद नाही. म्हणजेच, त्यांनी वाहना संबंधी आमच्या कंपनीला प्रिमीयम भरणा केली नव्हती. सदरचा उतारा हा संगणकीकृत आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. या उता-याचे प्रत्येक पानावर कार्यालयीन अभिलेखावरुन सदरचा दस्त पडताळणी केल्याचा शेरा तसेच माझी सही आहे. तसेच, त्यासोबत प्रमाणपत्र सुध्दा जोडलेले आहे.  तो नि.क्र. ५७ वर आहे. अपघाताची तारीख १९/१२/२०१५ असुन सदरची पॉलीसी दि. १७/०१/२०१५ पासुन दि. १६/०१/२०१६ पर्यंतची सादर केली होती. दि.१७/०१/२०१५ हा शनिवारचा दिवस होता व त्यादिवशी आमचे कार्यालय बंद असते.  कार्यालय बंद असल्या कारणामुळे इतर कोणाकडुन सुध्दा विमा पॉलीसी मिळू शकत नाही. येथे साक्षीदाराला दस्ताऐवज यादी निशाणी क्रमांक ४५ मधील दि. १७/०१/२०१५ रोजीचा कलेक्शन पेईंग स्लीपची प्रत दाखविण्यात आली. त्यावर सुध्दा माझी सही असुन आमचे कंपनीचा शिक्का आहे व त्यातील मजकुर बरोबर आहे. या उता-याप्रमाणे त्या विमा पॉलीसी संबंधी कोणत्याही ठिकाणी प्रिमीयमची भरणा झाली नव्हती. तो नि.क्र. ५८ वर आहे. अर्जदाराने दाखल केलेली विमा पॉलीसी नि.क्र. ३३ ही खोटी असुन सदर प्रकरणामध्ये नुकसान भरपाई देण्याची आमचे कंपनीची काहीएक जबाबदारी नाही.

<u>उलटतपास गैरअर्जदार क्र.१ साठी श्री एस.पी.सानप वकील - नाकारला</u>

<u>उलटतपासणी अर्जदारातर्फे श्री. देशमुख एस.जे. यांचे मार्फत सुरु.</u>

०२. हे खरे आहे की, सन २०१५ मध्ये मी गैरअर्जदार क्र. २ कंपनी यांच्या खामगांव शाखा येथे नेमणुकीस नव्हतो. आज रोजी मी माझे सोबत सदरचा संगणक तसेच सीपीयु आणलेला नाही. हे खरे नाही की, मी दाखल केलेले उतारे (नि.क्र. ५७ व ५८) हे अपुर्ण आहे. सन २०१५ मध्ये आमचे कंपनीला किती एजंट संलग्न होते, हे मला आज सांगता येणार नाही. मला अभिलेखावरुन सदरच्या प्रकरणाबद्दल माहिती आहे. या प्रकरणामध्ये आमचे तर्फे लेखी जबाब कोणी दाखल केला, हे मी आज सांगु शकत नाही. अभिलेखावरुन सदरची पॉलीसी नि.क्र. ३३ ही आम्ही दिली नसल्याची तक्रार, आज पावेतो आमच्याकडुन दाखल केल्याची दिसुन येत नाही. हे खरे आहे की, आमचे कंपनीत पैशा संबंधी काही गैरव्यवहार झाल्यास त्याची तक्रार आम्ही देत असतो. सदर प्रकरणाची नोटीस आम्हाला लागल्यापासुन आज पावेतो सदरची पॉलीसी नि.क्र. ३३ खोटी आहे तसेच आम्ही दिली नाही <u>याबबत</u> आम्ही पेपरमध्ये जाहीरात दिली नाही. हे खरे आहे की, आज मीतीस कोणताही इसम ऑनलाईन रित्या विमा पॉलीसी काढू शकतो. हे खरे नाही की, विमा पॉलीसी नि.क्र. ३३ ही ऑनलाईन काढलेली आहे. साक्षीदार स्वता: सांगतो की, ती खोटी आहे. हे खरे नाही की, हे असे मी खोटे सांगत आहे की, नि.क्र. ३३ विमा पॉलीसी आमचे कंपनीने दिली नसुन ती खोटी आहे. हे मी सांगु शकत नाही की, ऑनलाईन पॉलीसी कधीही भेटू शकते. साक्षीदार स्वता: सांगतो की, विमा पॉलीसी सुटीच्या दिवशी कार्यालयामार्फत जेनरेट होत नाही. हे खरे नाही की, असे मी खोटे सांगत आहे, विमा पॉलीसी सुटीच्या दिवशी कार्यालयामार्फत जनरेट होत नाही. सन २०१५ मध्ये आमचे कंपनीचे किती अधिकृत एजेंट होते, हे मी आज रोजी सांगु शकत नाही. हे खरे आहे की, अधिकृत एजेंट त्यांचे पोर्टलव्दारे विमा पॉलीसी काढुन देतात. साक्षीदार स्वता: सांगतो की, त्याची नोंद सुध्दा प्रिमीयम रजिष्टर नि.क्र. ५७ मध्ये येत असते. अभिलेखावरुन आज पावेतो विमा पॉलीसी नि.क्र. ३३ मधील नमुद मालक व एजेंट - कुणाल ए. जोशी यांचे विरुध्द आमचे कंपनीने पोलिस तक्रार केल्याचे दिसुन येत नाही. त्याचे कारण मला सांगता येणार नाही. सन २०१५ मध्ये जारी केलेल्या सर्व विमा पॉलीसी सबंधी रक्कमेच्या पावती मी सोबत आणले नाही. उतारा नि.क्र. ५७ दिलेल्या कालावधीच्या प्रिमियम भरल्याबद्दलच्या पावत्या येथे दाखल न करण्याचे कारण मी सांगु शकत नाही. हे खरे नाही की, विमा पॉलीसी नि.क्र. ३३ बद्दल सुध्दा आमचे कंपनीने एका एजेंट मार्फत मालकाला प्रिमियम भरल्याबद्दल पावती दिली होती, परंतु ती मी जाणुन बुजुन दाखल केली नाही. हे खरे नाही की, मॅन्युअल तसेच ऑनलाईन विमा पॉलीसीमधील मजकुर आम्ही बदलत असतो. हे खरे आहे की, विमा पॉलीसी नि.क्र. ३३ प्रमाणे अपघाताची तारीख व वाहन क्रमांक एमएच-२९-३६९२ कव्हर होतो. साक्षीदार स्वता:हुन सांगतो की, सदर पॉलीसी आमची नाही. हे खरे नाही की, असे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, मी जाणिवपुर्वक गैरअर्जदार क्र. १ चे नावाची नोंद उतारा नि.क्र. ५७ मध्ये बदल करुन दाखवली नाही. हे खरे नाही की, असे मी खोटे सांगत आहे की, सुटीच्या दिवशी

आमचे कार्यालय विमा पॉलीसी जेनरेट करत नाही. हे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरणाबद्दल मला कोणतीही माहिती नाही. तसेच सदर प्रकरणामध्ये आमचे कंपनीला कोणतीही नुकसान भरपाई द्यावी लागु नाही म्हणुन मी खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, उतारा नि.क्र. ५७ मधील मजकुर बरोबर नाही. हे खरे आहे की, अधिकारपत्र नि.क्र. ५६ मध्ये दस्ताऐवज दाखल करणेबद्दल नमुद नाही. हे खरे नाही की, उतारा नि.क्र. ५७ सोबत दिलेले प्रमाणपत्र अपुर्ण असुन भारतीय पुरावा कायद्याचे कलम ६५-ब प्रमाणे नाही. हे खरे नाही की, हा प्रमाणपत्र देण्याचे मला अधिकार नाही. हे खरे नाही की, घटनेच्या दिवशी म्हणजेच दि. १९/१२/२०१५ रोजी सदरची विमा पॉलीसी नि.क्र. ३३ वैध होती. हे खरे नाही की, या पॉलीसी प्रमाणे मयत हा त्रयस्त असल्याकारणाने पॉलीसीमध्ये कव्हर होते.

उलटतपासणी गैरअर्जदार क्र. ३ तर्फे - वारंवार पुकारा केला असता कोणी हजर नाही. म्हणुन, काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ASHOK GURUDASMAL SANTANI

Digitally signed by ASHOK GURUDASMAL SANTANI
Date: 2026.02.24 11:03:50 +0530

(ए.जी. संताणी)

सदस्य, मोटर अपघात प्राधिकरण,
बुलडाणा
दि. २३/०२/२०२६

माझे समक्ष

ASHOK GURUDASMAL SANTANI

Digitally signed by ASHOK GURUDASMAL SANTANI
Date: 2026.02.24 11:03:57 +0530

(ए.जी. संताणी)

सदस्य, मोटर अपघात प्राधिकरण,
बुलडाणा